जा.क्र./मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१७/ ६२४२
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक :- ०८/१२/ २०१७

**प्रति,**

**संस्थाचालक / प्राचार्य**
**शासनमान्य संगणक टायपिंग संस्था,**
**महाराष्ट्र व गोवा राज्य.**

**विषय :- जानेवारी - २०१८मध्ये घेण्यात येणाऱ्या जीसीसी-टीबीसी परीक्षा ३० व ४० श.प्र.मि. प्रि -लिस्ट मध्ये ऑनलाईन दुरुस्ती करणेबाबत.**
**संदर्भ :- जीसीसी-टीबीसी परीक्षा जानेवारी २०१८, दि. ०६ /११/ २०१७ रोजीची अधिसूचना.**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-०१ यांचे मार्फत जानेवारी २०१८ मध्ये घेण्यात येणाऱ्या GCC-TBC ३० व ४० w.p.m. या परीक्षेसाठी आवेदनपत्र भरलेल्या विद्यार्थ्याची ऑनलाईन प्रि-लिस्ट संस्थांना त्यांच्या Login द्वारे परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यानुसार दि.०८ डिसेंबर २०१७ ते दि. ११ डिसेंबर २०१७ या कालावधीत ऑनलाईन दुरुस्ती करावी. याबाबत पुढील सूचनेप्रमाणे कार्यवाही करावी.

१. विद्यार्थ्यांचे नाव पूर्णपणे बदलता येणार नाही. नावातील स्पेलिंग दुरुस्ती करता येईल.
२. फोटो चुकीचा अपलोड झाला असल्यास नव्याने फोटो स्वाक्षरीसह (JPG IMAGE) अपलोड करावी.
   मात्र त्याची साईज ३० KB पेक्षा जास्त नसावी.
३. विषयातील दुरुस्ती (मराठी/हिंदी/इंग्रजी) करता येईल.
४. कागदोपत्री (ऑफलाईन) दुरुस्ती केली जाणार नाही. दुरुस्त्या परीक्षा परिषदेकडे टपालाने अथवा ई-मेलद्वारे पाठवू नये. पाठविल्यास त्याची दखल घेतली जाणार नाही.
५. संस्थेने परीक्षा केंद्राचे ठिकाण निवडण्याबाबत स्वतंत्र पत्राद्वारे सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार संस्थांनी कार्यवाही करावी.

उपरोक्त सूचनांवर प्रि-लिस्टमधील दुरुस्ती करण्याची कार्यवाही संबंधित संस्थाचालक / प्राचार्य यांनी विहीत कालावधीत करावी.

(सुखदेव डेरे)
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०१.**

**प्रत :-**

**१. शिक्षणाधिकारी (माध्य) सर्व.**
**२. शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प)**